पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र
# ७,७०,०००/- रुपये किंमतीचा अवैध दारु व सळवा इतर मुद्देमालासह जप्त

स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली दिनांक- २८.०५.२०२१

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| चामोर्शी – १) अप.क्र. २१७/२०२१ कलम ६५(फ) ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम<br>२) अप.क्र. २१८/२०२१ कलम ६५(ई)(फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | मौजा विष्णुपुर जंगल परिसर १० किमी दक्षिण<br>**घटना ता. वेळ** :- दि. २७/०५/२०२१ चे १२:३० ते १८:०५ वा.पर्यंत | १) फिर्यादी सरकार तर्फे दादाजी मंगरुजी करकाडे नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय,गडचिरोली<br>२) फिर्यादी सरकार तर्फे पुष्पा वारलुजी कन्नाके नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली<br>**पाहिजे आरोपी - १) कालाचंद बिजय किर्तनीया**<br>**२) कमल वासुदेव बिश्वास**<br>**३) बिजय रमेन बिश्वास**<br>**४) जयंत माखन हलदर**<br>**५) मुकेश निदुर हलदर**<br>सर्व रा. विष्णुपुर ता .चामोर्शी जि. गडचिरोली<br>**पाहिजे महिला आरोपी - हाशी निरपीन शहा**<br>रा. विष्णुपुर ता .चामोर्शी जि.गडचिरोली |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | **स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली** – दादाजी करकाडे, शुक्राचारी गवई, मंगेश राऊत, सुनिल पुठ्ठावार, पुष्पा कन्नाके , शेषराज नैताम | |

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारुविक्री तसेच बेकायदेशीर दारु वाहतुकीस आळा बसावा याकरीता मा.श्री. अंकीत गोयल, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी जिल्हयातील अवैध दारु–जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २७/०५/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे मा. पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांचे आदेशाने पोलीस पथक दारु रेडकामी पोस्टे चामोर्शी परिसरात गस्त करीत असतांना मौजा विष्णुपुर येथील वरील नमुद ठोक दारु विक्रेते हे विष्णुपुर गावाचे जंगल परिसरात शेततळयाच्या बाजुला अवैध गुळाची दारु हातभट्टी लावण्यासाठी मोठया प्रमाणात गुळाचा सळवा टाकुन साहित्यांची जमवाजमव करुन ठेवलेले आहेत अश्या खबरेवरुन वरीष्ठांना माहीती देवुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वरील नमुद पोलीस पथक हे पोस्टे चामोर्शी परीसरात अवैध दारु रेड कारवाई करीता दोन स्थानिक पंचांना व मुखबीराला सोबत घेवुन मिळालेल्या माहीतीचे आधारे चामोर्शी, विष्णुपुर जंगल परीसरात पोस्टाफ सह आपआपले अस्तीत्व लपवुन जंगल परिसरातील शेततळयाच्या बाजुला मुखबीर व पंचासह वर नमुद ठोक दारु विक्रेते यांचे हातभट्टी गुळाची दारु काढण्याच्या ठिकाणाच्या आजुबाजुला जंगल परिसरात शोध घेउन पाहणी केली असता खालील वर्णनाचा व किंमतीचा अवैध हातभट्टी गुळाची दारु काढणेकरीता टाकलेला गुळाचा सळवा व इतर

साहित्य असा मुद्देमाल मिळुन आला तो खालीलप्रमाणे. **१) किंमत ६,४०,०००/- रुपये** - २०० लीटर क्षमतेचे निळया रंगाचे ३२ नग प्लास्टीक ड्रम ज्यामध्ये हातभट्टी गुळाची दारु गाळण्याकरीता टाकलेला ६४०० लीटर गुळाचा सळवा प्रतिलीटर १००/- रुपये प्रमाणे. **२) किंमत ३२०००/- रुपये** - २०० लीटर क्षमतेचे निळया रंगाचे ३२ नग ड्रम गुळाची दारु गाळण्याकरीता वापरण्यात येणारा सळवा टाकलेले. प्रति ड्रम १०००/- रुपये प्रमाणे. ३) **किंमत ४०००/- रुपये** - हातभट्टी गुळाची दारु गाळणेकरीता वापरलेले एकुण ०४ नग लोखंडी ड्रम. प्रति ड्रम १०००/- रुपये प्रमाणे.

तसेच आणखी एका कारवाईमध्ये वर नमुद पाहिजे महिला आरोपी ही आपले राहते घराचे शेजारी असलेल्या तिच्या मालकीच्या शेतामध्ये हातभट्टी गुळामोहाची दारु गाळुन चिल्लर विक्री करीत आहे अशी खबर मिळाल्याने तिचेवर प्रोरेड करणेकामी दोन स्थानिक पंचांना महिला पोस्टाफसह गेलो असता आमची चाहुल लागताच ती घटनास्थळावरुन जंगलाच्या दिशेने पसार झाली तिचा पाठलाग केला असता ती मिळुन आली नाही. तेव्हा घटनास्थळावर शोध घेतला असता तिथे खालील वर्णनाचा व किंमतीचा गुळामोहाची दारु व गुळामोहाचा सळव्याचा मुद्देमाल मिळुन आला तो खालीलप्रमाणे.

१) **किंमत १०,०००/- रुपये** - ५० लीटर क्षमतेची निळया रंगाची ०१ नग कॅन ड्रम. ज्यामध्ये ५० लीटर हातभट्टी गुळामोहाची दारु .प्रतिलीटर २००/- रुपये प्रमाणे. २) **किंमत ८०,०००/- रुपये** - २०० लीटर क्षमतेचे निळया रंगाचे ०४ नग प्लास्टीक ड्रम. ज्यामध्ये हातभट्टी गुळामोहाची दारु गाळण्याकरीता टाकलेला ८०० लीटर गुळामोहाचा सळवा प्रतिलीटर १००/- रुपये प्रमाणे. ३) **किंमत ४०००/- रुपये** - २०० लीटर क्षमतेचे निळया रंगाचे ०४ नग प्लास्टीक ड्रम. गुळामोहाची सळवा टाकण्याकरीता वापरलेले. प्रति ड्रम १०००/- रुपये प्रमाणे.

अश्या दोन वेगवेगळया कारवायांमध्ये **एकुण ७,७०,०००/- रुपये किमतींचा अवैध हातभट्टी गुळामोहाची दारु, सळवा व इतर मुद्देमाल** घटनास्थळावरुन जप्ती करुन पंचासमक्ष ताब्यात घेवुन सदर सळवा व दारु हे नाशवंत असल्याने सी.ए सॅम्पल वेगळा काढुन उर्वरीत मुद्देमाल निर्जनस्थळी ड्रम व साहित्यासह पंचासमक्ष नाश करण्यात आला. दोन्ही गुन्हयातील सहा ही पाहिजे आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन चामोर्शी येथे वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(उल्हास पी. भुसारी)
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली